किटकशास्त्र विभाग, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

त्वरित प्रसारणासाठी
पीक संरक्षण पत्रिका क्र.१४

जा.क.विप्रकि/ पिसंयो / 742/२०२६
दि. 27/10/2026

हरभऱ्यावरील रोपे, शेंडे व पाने कुरतडणारी अळी (कट वर्म) व घाटे अळी या किडीची ओळख व व्यवस्थापन

हरभरा हे रबी हंगामातील महत्वाचे पिक आहे. या पिकाची पेरणी ऑक्टोंबरच्या महिन्यात झालेली असुन, परेणी नंतर पिक कोवळे असतांना तसेच पिकाच्या वाढीव अवस्थेत येणारी महत्वाची किड म्हणजे रोपे, शेंडे व पाने कुरतडणारी अळी (कट वर्म). तसेच पिक फुलोऱ्यावर आल्यानंतर घाटे अळी ही महत्वाची किड असुन यामुळे होणारे नुकसान टाळण्याकरीता या किडीची ओळख, नुकसानीचा प्रकार व व्यवस्थापन संदर्भात माहिती जाणुन घेऊन योग्य वेळी व्यवस्थापन करणे आवशक आहे. या दोन्ही महत्वाच्या किडींची ओळख व व्यवस्थापन खालील प्रमाणे आहे.



१) रोपे, शेंडे व पाने कुरतडणारी अळी (कट वर्म):

ओळख : हि एक बहुभक्षीय किड असुन या किडीचा प्रादुर्भाव प्रामुख्याने उशिरा पेरणी केलेल्या पिकावर होतो. मादी पतंग सुरुवातीला पिकाच्या व तणाच्या पानांवर तसेच कोवळया शेंडयांवर एक एक करून किंवा समुहाने ३०० ते ४५० अंडी घालते. अळीची लांबी ही ०.२ ते १.५ इंच असते या अळीचा रंग हा भुरकट हिरवा, काळपट किंवा करडा असतो. या अळीच्या शरीरावर करडया रंगाचा पट्टा शरीराच्या दोन्ही बाजुने असतो. शेतामधे पाने, शेंडे कुरतडलेल्या अवस्थेत दिसुन येतात, मात्र अळी ही झाडाच्या बुंदयाला माती मधे लपून बसते व मुख्यत्वे रात्री पिकावर येवुन पाने व शेंडे कुरतडते. प्रादुर्भाव जास्त असल्यास दिवसा देखील हि अळी पिकावर आढळून येते. पुर्ण वाढ झालेली अळी १.५ ते २ इंच लांब असते. अळीला स्पर्श केल्यास ती शरीराचा "C" आकार करतांना दिसुन येते. पिकाच्या सर्व अवस्थामधे या अळीचा प्रादुर्भाव होवू शकतो. हि किड रोप अवस्थेत प्रादुर्भाव झाल्यास रोप कुरतडते व नंतरच्या अवस्थेत प्रादुर्भाव झाल्यास पाने व शेंडे कुरतडते. पुर्ण वाढ झालेली अळी ही जमिनीमधे कोषावस्थेत जाते.




व्यवस्थापन:

१. शेतामधे किंवा बांधावर कचऱ्याचे ढीग तसेच तण राहणार नाही असे नियोजन करावे.
२. प्रति हेक्टर २० पक्षीथांबे शेतात उभारावेत. त्यामुळे पक्षी किडींच्या अळया खाऊन फस्त करतात.
३. या अळीचा प्रादुर्भाव लष्करी अळी प्रमाणे एकच वेळी आढळून येते म्हणुन शेतातील पिकामध्ये मादी पतंगाने अंडी घालूनये या करीता प्रतिबंधात्मक उपाय म्हणुन निंबोळी अर्क ५ टक्के **किंवा** अझाडिरेक्टीन ३०० पीपीएम ५० मिली **किंवा** अझाडिरेक्टीन १५०० पीपीएम २५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
४. प्रादुर्भाव २ अळया प्रति मिटर ओळ अशी आर्थिक नुकसानीची पातळी आढळून आल्यास क्लोरपायरीफॉस २० टक्के ईसी ५० मिली **किंवा** क्लोरँट्रॅनिप्रोल १८.५ टक्के ३.० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. (रासायनीक किटकशाकांच्या शिफारसी ह्या तदर्थ **(Adhoc)** स्वरुपाच्या आहेत).
५. आवशक्ता भासल्यास १५ दिवसांच्या अंतराने दुसरी फवारणी करावी.



२)घाटे अळी :



पक्षी थांबा

ओळख : या किडींची मादी पतंग पानावर, कोवळया शेंडयावर, कळयांवर व फुलांवर एकेरी अंडी घालते. ही अंडी खसखसीच्या दाण्यासारखी दिसतात. त्यातून २ ते ३ दिवसात अळी बाहेर पडते. ही अळी पानावरील हरीत द्रव्य खरडून खाते. त्यामुळे पाने प्रथम पिवळसर पांढूरकी होऊन वाळतात व गळून पडतात. थोडया मोठया झालेल्या अळया संपूर्ण पाने व कोवळी देठे खाऊन फस्त करतात. त्यामुळे झाडावर फक्त फांदयाच शिल्लक राहतात. पुढे पिक फुलो-यावर आल्यावर हया अळीचा प्रादुर्भाव वाढतो व अळया प्रामुख्याने फुले व घाटयांचे नुकसान करतात. मोठया झालेल्या अळया घाटयाला छिद्र करून आतील दाणे खाऊन घाटे पोखरतात. एक अळी साधारणत: ३० - ४० घाटयांचे नुकसान करते.

एकात्मिक व्यवस्थापन


फेरोमोन सापळा

- घाटे अळीचे परभक्षक उदा. बगळे, मैना, राघो, निळकंठ, काळी चिमणी ईत्यादी पिकामधे फिरून घाटे अळया वेचून त्यांचे पिकावरील नियंत्रण करतात. अवाजवी किटकनाशकाची फवारणी केल्यास पक्षी किटकनाशकांच्या वासामुळे शेतामधे येणार नाहीत. त्यामुळे किटकनाशकाचा जास्त वापर टाळावा.
- ज्या शेतामधे मका किंवा ज्वारीचा नैसर्गिक पक्षी थांबे म्हणुन उपयोग केला नसेल त्या शेतामधे बांबुचे त्रिकोणी पक्षी थांबे (प्रती हेक्टर २० पक्षी थांबे) तयार करून शेतामधे लावावे. त्यामुळे पक्षांचे अळया वेचण्याचे काम सोपे होते.
- कामगंध सापळयाचा वापर करावा. यासाठी घाटे अळीचे कामगंध सापळे (हेक्झाल्युर) एकरी दोन किंवा हेक्टरी पाच सापळे याप्रमाणे लावावेत. सापळयामधे सतत तीन दिवस आठ ते दहा पंतग आढळल्यास किड व्यवस्थापनाचे उपाय योजावेत.
- शेतकरी बंधुंनी आपल्या पिकाचे निरीक्षण करून किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान संकेत पातळीच्यवर (१ ते २ अळया प्रति मिटर ओळ) आढळून आल्यास किंवा ४० ते ५० टक्के पिक फुलो-यावर आल्यानंतर घाटेअळीचे व्यवस्थापनासाठी खालील प्रमाणे पिक परिस्थिती नुसार फवारणी करावी.


घाटे अळी

<u>पहिली फवारणी (५० टक्के फुलोरावर असतांना)</u>

- निंबोळी अर्क ५ टक्के **किंवा** एच.ए.एन.पि.व्हि (१x१०^{९} पिओबी/मिली) ५०० एल.ई./ हे. **किंवा** क्विनॉलफॉस २५ ई.सी.,२० मि.ली.

<u>दुसरी फवारणी (पहिल्या फवारणीनंतर १५ दिसानंतर)</u>

- स्पिनेटोरम ११.७० टक्के एससी ९ मिली **किंवा**
- इमामेक्टीन बेझोएट ५ टक्के एस जी ४ ग्रॅम **किंवा**
- ईथिऑन ५० टक्के ईसी २५ मिली **किंवा**
- इंडोक्झाकार्ब १५.८० इसी ६.६ मिली **किंवा**
- लॅंबडा सायहेलोथ्रीन ०.५ इसी १० मिली

वरील पैकी कोणत्याही एका किटकनाशकाची प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

टीप : वरील किटकनाशकांची मात्रा ही साध्या नॅपसॅप स्पेअरसाठी शिफारशीत असुन पावर स्प्रेने फवारणी करावयाची असल्यास वरील किटकनाशकांची मात्रा तिप्पट करावी.

(डी. बी. उंदीरवाडे)
विभाग प्रमुख, किटकशास्त्र विभाग
डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला

प्रतिलीपी - सर्व स्तरावरून प्रचार व प्रसारा करीता

मा. आयुक्त(कृषि), मा.संचालक (विस्तार) कृषि आयुक्तालय, मा. संचालक (संशोधन), डॉ. पंदेकृवि, मा. संचालक (विस्तार शिक्षण), डॉ. पंदेकृवि, सहसंचालक (कृषि), अमरावती, नागपूर विभाग, सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व उपविभागीय कृषि अधिकारी, कुलगुरू यांचे तांत्रिक सचिव यांना मा. कुलगुरू, डॉ. पंदेकृवि, सर्व कृषि विज्ञान केंद्र, विद्यापीठाचे माहिती अधिकारी, डॉ. पंदेकृवि, अकोला, सर्व वर्तमानपत्रे